# फौ.कि.न्या.अर्ज क्र. ८६५/२०२२ मधील निशाणी १ खालील आदेश

अर्जदार श्री.राहुल सोपान जाधव यांनी प्रस्तुतचा अर्ज जन्म, मृत्यू व विवाह नोंदणी अधिनियम, १९६९ कलम १३ प्रमाणे दाखल केला आहे.

## अर्जदाराचे कथन खालीलप्रमाणे असे आहे की,

२. अर्जदार यांची आई कै.चंपा सोपान जाधव यांचा मौजे अतित, ता. जि.सातारा येथे दिनांक २६.०७.१९८० रोजी मृत्यू झाला आहे. अर्जदार यांचे आईच्या मृत्यूची नोंद मौजे अतित,ता.जि.सातारा यांचे रेकॉर्डसदरी होणे आवश्यक होती, सदरील अर्जदार व त्यांच्या घरचे कुटुंबिय यांना कायदयाचे ज्ञान नसलेने सदरील अर्जदार याचे मृत्युची नोंद करणेचे राहुन गेलेले आहे. अर्जदार यांना त्यांच्या आईच्या मृत्यूचा दाखला वारसांच्या नोंदी करणेसाठी तसेच इतर शासकीय कामी मिळणे आवश्यक आहे. अर्जदार यांनी ग्रामपंचायत मौजे अतित, ता.जि.सातारा यांचेकडे मृत्यूच्या नोंदीबाबत चौकशी केली असता तशी नोंद मिळून येत नसल्याचे ग्रामपंचायतीने त्यांना कळवले. सबब, अर्जदार यांचे आईच्या मृत्यूची नोंद करणेबाबत ग्रामपंचायत मौजे अतित, ता.जि.सातारा यांना आदेश होणेची विनंती केली.

३. अर्जदार यांनी अर्जाचे पुष्ठ्यर्थ त्यांचे शपथपत्र निशाणी क्र.४ येथे दाखल केले आहे. तसेच ग्रामपंचायत मौजे अतित, ता.जि.सातारा यांचा त्यांच्या आईच्या मृत्यूची नोंद नसल्याबाबतचा दाखला दाखल केला आहे.

४. अर्ज, प्रतिज्ञापत्र व अभिलेखावर दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. अर्जदार यांनी कथनांच्या पुष्ठ्यर्थ स्वतःचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र नि.७ येथे सादर करून अर्जामधील कथनांचा ऊहापोह केलेला चंपा सोपान जाधव आहे. तसेच, अर्जदार यांनी निशाणी क्र.८ श्री. हरिदास गणपती जाधव यांचे प्रतिज्ञापत्र दाखल केले

आहे. त्यांनी त्यांच्या प्रतिज्ञापत्रामध्ये अर्जदार यांची आई ही त्यांची भावजय असून त्या दि.२६.०७.१९८० रोजी मयत झाल्याचे कथन केले आहे. अर्जदार यांनी त्यांचे चंपा सोपान जाधव आईच्या मृत्यूची नोंद होणेसाठी ''दैनिक तरुण भारत'' मध्ये दिनांक १६/१२/२०२२ रोजी जाहीर नोटीस देण्यात येवून हरकती मागविण्यात आल्या होत्या. परंतू, त्यास कोणीही हरकती नोंदविल्या नाहीत. अर्जदार यांची आई कै. चंपा सोपान जाधव यांचा मृत्यू दिनांक २६.०७.१९८० रोजी मौजे अतित, ता.जि.सातारा येथे झाला असून मृत्यूची नोंद त्यांचे अभिलेखावर झालेली नसल्याने त्याबाबतची नोंद करण्याचे आदेश अतित ग्रामपंचायत यांना देण्याची विनंती केली. अर्जदार यांनी सादर केलेला पुरावा विना आव्हानित असल्याने व सदर अर्जाचे पृष्टर्थ अर्जदार यांचे शपथपत्रावरुन व कागदोपत्री पुराव्यावरुन, अर्जातील चंपा सोपान जाधव संपुर्ण कथने बरोबर आहेत असे माझे मत आहे. सबब, अर्जदार यांची विनंती मंजूर करणे न्यायोचित वाटते. म्हणून, मी खालील आदेश करीत आहे.

## <u>आदेश</u>

ग्रामसेवक, ग्रामपंचायत मौजे अतित, ता.जि.सातारा यांना असे आदेशित करणेत येते की, अर्जदार श्री. राहुल सोपान जाधव यांची आई कै. चंपा सोपान जाधव यांचा मृत्यू दिनांक २६.०७.१९८० रोजी मौजे मौजे अतित,ता.जि.सातारा, येथे झाला असलेची नोंद नियमानुसार विलंब शुल्क आकारुन ग्रामपंचायतीचे अभिलेखास करावी.

**ठिकाण** – सातारा. एन.ए.ओतारी,

**दिनांक** – ०४.०७.२०२३ **९वे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, सातारा.**